## नि.३४१ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांनी युक्तीवाद करणेपूर्वी प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११ ते १७, २०, २३ व २६ यांना प्रथम युक्तीवाद करणेबाबत आदेश व्हावा याकरीता दाखल केला आहे.

२) वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११ ते १७, २०, २३ व २६ यांनी वादीने आपला पुरावा बंद केल्यानंतर त्यांचा पुरावा बंद केला आहे. त्यामुळे दाव्यात प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११ ते १७, २०, २३ व २६ यांनी प्रथम युक्तीवाद करावयाचा आहे. त्यामुळे त्यांना वादीने युक्तीवाद करणेपूर्वी युक्तीवाद करणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३) प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११ ते १७, २०, २३ व २६ यांनी यांनी प्रस्तुत अर्जावर नि ३४२ कडे आपले म्हणणे सादर करुन अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११ ते १४ , १६ व १७ यांनी प्रस्तुत दाव्याचे कामी तोंडी पुरावा दिलेला नाही व मे. कोर्टाने नि. १ वर दिनांक २१/१/२०१९ रोजी आदेश करुन प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११ ते १४ , १६ व १७ यांचा पुरावा बंद केला आहे. त्यामुळे अंतिम तोंडी पुरावा वादीने दिला असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता मधील तरतुदीनुसार वादीने प्रथम युक्तीवाद करणे आवश्यक आहे. तसेच नि. ८० कडे जे मुद्दे काढण्यात आले आहेत त्यामध्ये मुद्दा क्र. १ ते ५ येथे दावा जमिनीवरील मालकी तसेच कब्जा भोग्य सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर ठेवण्यात आली आहे. त्यामुळे ते सिध्द करण्याची जबाबदारी वादीची आहे. तसेच वादीने प्रस्तुत दावा अतिक्रमणाचा दाखल केला आहे. ते सिध्द

करण्याची जबाबदारी देखील वादीवर आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४) अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

५) वादीने प्रस्तुत दावा कायम ताकीद आदेशासाठी व कब्जाकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दावा सन १९९३ पासून प्रलंबित आहे. वादीने अर्ज कायद्याचा कोणत्या तरतुदीखाली दिला आहे त्याचा उल्लेख केला नाही. दावा सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. वादीने प्रथम युक्तीवाद केल्याने त्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादीने युक्तीवाद केल्यास त्यावर वादीला प्रतिउत्तर देण्याची संधी उपलब्ध आहे. वादीने दाव्याचे कामकाज पुढे ढकलण्याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.02.11 17:29:25 +0530

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी

ठिकाण : सावंतवाडी
दिनांक ११/०२/२०२६